**सर्व शासकीय पत्रव्यवहार, नस्त्या, प्रस्ताव इत्यादींमध्ये विभागाचे नाव “इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग” असे नमूद करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण-२०२६/प्र.क्र.११/प्रशा-०१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ११ मे, २०२६

**संदर्भ :** शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग ( प्रशासकीय सुधारणा, उत्कृष्टता व नाविन्यता ) क्र. शाकानि-२०२६/प्र.क्र.२०/र.व.का.-१,दि. २१ एप्रिल, २०२६.

**शासन परिपत्रक:**

संदर्भाधीन अधिसूचनेन्वये “इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग” हा नवीन विभाग स्थापन करण्यात आलेला आहे. सदर अधिसूचनेनुसार पूर्वीच्या "माहिती तंत्रज्ञान कार्यासन” हे आता “इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग” या नवीन विभागात वर्ग करण्यात आले आहे. सबब यापुढे सर्व शासकीय कामकाज, पत्रव्यवहार, नस्त्या, प्रस्ताव तसेच e-Office प्रणालीमधील नोंदी नव्या विभागीय नामनिर्देशनानुसार करण्यात येणे आवश्यक आहे.

२. अद्यापही काही विभागांकडून या विभागाकडे सादर करण्यात येणारे प्रस्ताव, नस्त्या तसेच इतर शासकीय पत्रव्यवहारामध्ये “माहिती तंत्रज्ञान विभाग” असे जुने नामनिर्देशन वापरण्यात येत आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजामध्ये तांत्रिक अडचणी तसेच अभिलेख व्यवस्थापनामध्ये विसंगती निर्माण होऊ शकते.

४. त्याअनुषंगाने, सर्व प्रशासकीय विभाग, त्याअंतर्गत कार्यालये, विभागप्रमुख तसेच अधिनस्त कार्यालयांना निर्देशित करण्यात येते की, यापुढे e-Office प्रणालीद्वारे सादर करण्यात येणाऱ्या सर्व नस्त्या, प्रस्ताव, पत्रव्यवहार, संदर्भ नोंदी, अभिप्राय तसेच इतर सर्व शासकीय कामकाजामध्ये विभागाचे नाव “इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग” असेच अचूक व पूर्ण स्वरूपात नमूद करण्यात यावे.

५. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच, आपल्या विभागाच्या संबंधित अधिनस्त कार्यालयांनाही याबाबत आवश्यक सूचना देण्यात याव्यात, जेणेकरून भविष्यात कोणत्याही प्रकारची त्रुटी अथवा विसंगती उद्भवणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०५१११३०९१६६४११ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DURGAPRASAD
POCHAYYA
MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI,
2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48C
C2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B
0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA
MYLAWARAM
Date: 2026.05.11 18:07:39 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री ( नगर विकास व गृहनिर्माण ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
१५) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१८) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०) सर्व पोलीस आयुक्त,
२१) सर्व विभागीय आयुक्त,
२२) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,

२४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२५) सर्व जिल्हाधिकारी,
२६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२७) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२८) सर्व मंत्रालयीन विभाग,
२९) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३१) निवडनस्ती/प्रशा-०१